**पूर्व मान्यतेसाठी**

**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स रॉकिंग बॉम्बे बेव्हरेजेस प्रायव्हेट लिमिटेड, (आर.बी.बी.पी.एल.) उसरोली, तालुका- खालापूर, जिल्हा-रायगड यांच्या १२५.० केएलपीडी इथेनॉल आणि १२५.० केएलपीडी एक्स्ट्रा न्युट्रल अल्कोहोल (ENA) उत्पादन तयार करण्यासाठी २५०.० केएलपीडी धान्यावर आधारित आसवणी प्रकल्पाची उभारणीसाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत –**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स रॉकिंग बॉम्बे बेव्हरेजेस प्रायव्हेट लिमिटेड, उसरोली, तालुका- खालापूर, जिल्हा-रायगड यांच्या १२५.० केएलपीडी इथेनॉल आणि १२५.० केएलपीडी एक्स्ट्रा न्युट्रल अल्कोहोल (ENA) उत्पादन तयार करण्यासाठी २५०.० केएलपीडी धान्यावर आधारित आसवणी प्रकल्पाची उभारणीसाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक १० जून, २०२२ रोजी दुपारी १२.३० वाजता हर्षाली हॉटेल, सांगडेवाडी, ग्रुप ग्रामपंचायत देवन्हावे, , तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड (४१० २०३) येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री विद्यासागर किल्लेदार, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड तथा सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डॉ. पदमश्री बैनाडे, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक यांनी सांगितले कोविड-१९ संसर्गजन्य साथीच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशांनुसार पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली.

आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या

अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स रॉकिंग बॉम्बे बेव्हरेजेस प्रायव्हेट लिमिटेड, उसरोली, तालुका- खालापूर, जिल्हा- रायगड यांच्या १२५.० केएलपीडी इथेनॉल आणि १२५.० केएलपीडी एक्स्ट्रा न्युट्रल अल्कोहोल (ENA) उत्पादन तयार करण्यासाठी २५०.० केएलपीडी धान्यावर आधारित आसवणी प्रकल्पाच्या उभारणीसाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ए ५ (जी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागाची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम या बाबत माहिती देणे व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे हा आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागातील तज्ज्ञ समितीस प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक १६-०३-२०२२ रोजी सादर केला व त्या अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक २३-०३-२०२२ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी,रायगड-अलिबाग यांनी प्रत्यक्ष (Physical) आणि ऑनलाईन पर्यावरणविषयक जनसुनावणी Webex Meet App. व्दारे शुक्रवार, दिनांक १० जून, २०२२ रोजी घेण्यास मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-३२, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२२०५२६-एफटीएस-०१४९, दिनांक २६/०५/२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, रायगड-अलिबाग - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-१ - **आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-१ , महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर दैनिक वृत्तपत्र कृषिवल, रायगड व सकाळ या स्थानिक वृत्तपत्रामध्ये मराठीत व इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रात इंग्रजीत जनसुनावणीबाबत दि. १०-०५-२०२२ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड
२) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, रायगड
४) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय-रायगड, मप्रनि मंडळ, नवी मुंबई
५) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड—१, उप प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, नवी मुंबई
६) मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई
७) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई
८) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर
९) प्रांत कार्यालय, कर्जत, जिल्हा-रायगड,
१०) तहसीलदार, तहसील कार्यालय, खालापूर, जिल्हा-रायगड,

११) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड,

१२) ग्रामपंचायत कार्यालये –उसरोली, खरवली, नारंगी, खानाव, चिलथन, नंदनपाडा, देवन्हावे,तालुका – खालापूर, जिल्हा-रायगड,

१३) संकेतस्थळ, म.प्र.नि.मंडळ

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी म.प्र.नि. मंडळास ईमेलव्दारे व पत्राव्दारे काही आक्षेप प्राप्त झालेले आहेत व त्याच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

सदस्य, आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

त्यांनी सांगितले की ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून कोणताही निर्णय वा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. सदरहू सूचना/आक्षेप यांची इतिवृतान्तात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकास सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयास सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली.

त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापनासाठी एकूण भांडवली गुंतवणूक रुपये ३,०००.० लाख आहे. तर पर्यावरण व्यवस्थापनासाठीचा आवर्ती खर्च रुपये ३५०.० एवढा प्रती वर्षी आहे.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आले. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की प्रकल्पाबाबत आपल्या पर्यावरणविषयक विचार, सूचना वा आक्षेप

आहेत, त्या थोडक्यात मांडाव्यात. सूचना किंवा आक्षेप नोंदविताना आपले नाव व गावाचे नाव सांगावे.

**खालील् व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ यांनी खालील प्रमाणे उत्तरे दिली -**

**१) श्री भूषण सूर्यकांत पाटील, राहणार-खाणाव गाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

श्री भूषण पाटील यांनी सांगितले की हा प्रकल्प माझ्या गावापासून जवळजवळ ६००-७०० मीटर्स अंतरावर कार्यान्वित होणार आहे. त्यामुळे रोजगाराची संधि स्थानिकांना मिळणार असून मी मिळविलेल्या माहितीनुसार सदरहू प्रकल्प हा पर्यावरणपुरक आहे. मी स्थानिक नागरिकांशीही चर्चा केली असून त्यातून असे निष्पन्न झाले की जर पेट्रोलला पर्याय म्हणून इथेनॉल निर्मिती होत असेल, तर हा प्रकल्प संपूर्ण महाराष्ट्राला व देशाला फायदेशीर आहे. या प्रकल्पाच्या सीएसआर निधीव्दारे परिसरातील आदिवासी समाज घटकांनाही फायदा होऊ शकेल.

**२) ऑनलाईन प्रणालीवरुन श्री पुरुषोत्तम, महर्षि वेदविज्ञान संस्थाः-**

श्री पुरुषोत्तम यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की सदरहू प्रकल्प हा समाजाच्या विकासासाठी चांगला असला तरी सदरहू प्रकल्पासाठी जो भूखंड विकत घेण्यात आलेला आहे, तो महर्षि वेदविज्ञान संस्थेने १९८४ साली विकत घेतलेला आहे. याबाबत आम्ही सर्वेक्षण करत असताना आक्षेप घेतले असून आमचे वकील श्री विशालसिंग यांच्यातर्फे सादर करण्यात आलेले आहेत. ३-४ सर्व्हे नंबरबाबत आमचे आक्षेप नोंदविलेले आहेत. ते सर्व्हे नंबर १७/१५, २१/१ १७/१९ तरी त्यांनी पर्यावरण अनुमती मंजूर करताना प्रकल्प भूखंडाच्या कायदेशीर मालकीचाही विचार करण्यात यावा.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की याबाबत आम्ही भूखंडाबाबत सर्व कागदपत्रे म्हणजे एन.ए., ७/१२ उतारा आम्ही ईआयए अहवालासोबत जोडलेले असून परत सादर करण्यात येईल. त्यावेळी श्री पुरुषोत्तम यांनी आक्षेप नोंदविला की ७/१२ हा कायदेशीर कागदपत्र नसून सेल डीड हे कायदेशीर कागदपत्र आहे.

यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ऑनलाईन व्यक्तीस उत्तर देताना माहिती दिली की सदरहू समितीस भूखंडाची मालकी ठरविण्याचा अधिकार नाही. हे व्यासपीठ जमिनीची मालकी निश्चित करण्यासाठी नाही. ही समिती प्रस्तावित प्रकल्पाचा

पर्यावरणावर होणारा परिणाम व त्यासाठी कराव्या लागणा-या उपाययोजना यासाठी आहे. मात्र आपणास आश्वासन देण्यात येते की नियमाप्रमाणे जी काही घटनात्मक प्रक्रिया आहे, म्हणजे महसूल न्यायालय वा इतर याठिकाणी आपणास अर्ज सादर करावा लागेल. तरी बैठकीत सांगण्यात येते की आपण संबंधित विभागास अर्ज सादर करावा.

**३) श्री भाई शिंदे, ग्रामस्थ, ग्रामपंचायत, खाणाव,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

श्री भाई शिंदे यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की येथे रॉकींग बॉम्बे या प्रस्तावित प्रकल्पाची जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. जरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाव्दारे पर्यावरणविषयक दस्तावेज संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते, तरी याबाबत ग्रामस्थांना सदरहू प्रकल्पाची माहिती, फायदे तोटे याबाबत जी जनजागृती आवश्यक होती, ती करण्यात आलेली नाही. ज्या उसरोली गावात प्रस्तावित प्रकल्प कार्यान्वित होणार आहे, तेथील ग्रामस्थांची दिशाभूल करण्यात येत आहे. त्यांनी आक्षेप नोंदविताना विचारणा केली की प्रकल्प ज्या ठिकाणी उभारण्यात येणार आहे, ते क्षेत्र हरितपट्टा (Green Belt Zone) विभागात येत असून तेथे रासायनिक प्रकल्प (Chemical Plant) उभारण्यास कशी मान्यता देण्यात आलेली आहे याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. प्रकल्प स्थानापासून ५-६ कि.मी. अंतरावरील परिसर, तेथील नारंगी ग्रामपंचायत ही चिलवन ग्रामपंचायतीला लागून असून तेथे Eco-Sensitive Zone आहे. तरीसुध्दा जर येथे प्रकल्प उभारणार असाल, तर पर्यावरणाचा निश्चित -हास होणार आहे. ही वस्तूस्थिती प्रकल्पाच्या पर्यावरण अहवालात व सादरीकरणात दाखविण्यात आलेली नाही. प्रकल्प स्थानापासून फक्त २०० मीटर्स अंतरावर खानेवाडी गाव आहे. तेथील ग्रामस्थ बैठकीस आलेले आहेत. सदरहू प्रस्तावित प्रकल्पाचे उत्पादन, पर्यावरण संरक्षण उपाययोजना याबाबत काहीही मार्गदर्शन स्थानिकांना करण्यात आलेले नाही. म्हणून आमचा या प्रकल्पास विरोध आहे.

श्री भाई शिंदे यांनी आक्षेप नोंदविला की हरितपट्ट्यात केमिकल कंपनी कशी स्थापन करता येते, मग तो हरित पट्टा केमिकल झोन म्हणून नियमाप्रमाणे वर्गीकृत करण्यात आलेला आहे का? कंपनीत काय उत्पादन होणार आहे? याबाबत म.प्र.नि.मंडळाने आम्हांला माहिती द्यावी. येथून ५०० मीटर्स अंतरावरच वनक्षेत्र आहे. प्रकल्प उत्पादनामुळे प्रदूषणात वाढ होणार आहे. कारण प्रकल्पात दिवसाला २५०.० टन कोळसा लागणार आहे. आमचे प्रकल्प उभारणी व विकासाबाबत दुमत नाही. मात्र प्रकल्प स्थानापासून जवळच समाजातील अत्यंत दुर्बल घटक, आदिवासी यांचे वास्तव्य असून अत्यंत मागासलेला भाग आहे. मात्र काही लोक त्या लोकांची दिशाभूल करत आहेत.

श्री भाई शिंदे यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्पात जर २५०.० टन कोळसा रोज जाळणार असाल, तर त्याचे प्रदूषण हे मोठ्या प्रमाणात होणार आहे. अगोदरच येथील स्थानिक नागरिक हे इतर कंपन्यांच्या प्रदूषणामुळे त्रस्त आहेत. म्हणून ग्रामस्थ म्हणून आमचा या प्रस्तावित रॉकिंग बॉम्बे प्रकल्पाला विरोध आहे. पर्यावरणाचा -हास करणारा हा प्रकल्प आहे. ते म्हणाले की जरी प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की येथे २५० व्यक्तींना रोजगाराची संधि देण्यात येणार आहे, तरीही खात्रीपूर्वक सांगतो पुढील दुष्परिणाम हे पर्यावरणावर अत्यंत घातक असतील. तसेच परिसरातील लोकांना कॅन्सर, टी.बी. सारखे असाध्य आजार होतील, त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक संबंधित स्थानिक व्यक्तींची जबाबदारी घेणार का असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. येथे अत्याधुनिक हॉस्पिटल नाही. तरी ग्रामस्थ म्हणून या प्रकल्प उभारणीस आमचा विरोध आहे.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी प्रकल्प प्रवर्तकांना श्री भाई शिंदे यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर उत्तर देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर देताना सांगितले की प्रकल्पासाठी जमिन अधिग्रहण करताना सर्व शासकीय निर्देश पाळावेच लागतात. नाहीतर पर्यावरण मंत्रालय कारखाना उभारणी प्रस्ताव स्विकारतच नाही. सादरीकरणात जो नकाशा दाखविण्यात आला, ती गुगल इमेज आहे. याअगोदर भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयातील तज्ज्ञ समितीसमोर आमचे सादरीकरण झालेले आहे. त्यांनी सर्व बाबींचा विचार करुनच भारत सरकारने प्राथमिक मान्यता - संदर्भ व अटी - Terms of Reference (ToR) मंजूर केलेला आहे. त्यामुळे प्रकल्प स्थान व आजूबाजूचा परिसर हा उपस्थित केलेल्या मुद्द्यांप्रमाणे म्हणजे हरितपट्टा असता, तर प्रस्ताव मंजूर केला गेला नसता. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की प्रस्तावासोबत सर्व कागदपत्र सादर करण्यात आलेली असून ती ऑनलाईनही पाहू शकतात.

त्यांनी पुढे सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार (वेळोवेळी सुधारित) प्रकल्प स्थानापासून १० कि.मी. परिघाचे सर्वेक्षण व अभ्यास करण्यात आलेला असून १० कि.मी. परिघात राखीव वन (Reserved Forest) नाही. ऐतिहासिक स्थळ (Historical Monument) नाही. कर्नाळा पक्षी अभयारण्य (Karnala Bird Sanctuary) हे १० कि.मी. परिघाबाहेर आहे. त्यामुळेच केंद्र सरकारकडून परवानगी मिळाली. त्यांनी पुढे सांगितले की प्रकल्प उभारणीचे भूखंड व क्षेत्र हे औद्योगिक संवर्गातच (Industrial Zone) मोडत आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पुढे उत्तर देताना सांगितले की सदरहू कंपनी ही रासायनिक उद्योग (Chemical Industry) नाही. इथेन्नॉल हे बायो-फ्युएल असून ते पेट्रोलमध्ये १०% मिसळण्यात येते.

राखीव वन (Reserved Forest) नाही या मुद्द्यावर काही स्थानिकांनी आक्रमक शंका उपस्थित केली असता अध्यक्षा यांनी प्रकल्प प्रवर्तकांचे प्रथम उत्तर ऐकून घेण्याची सूचना केली. यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की केंद्र व राज्य शासनाने अधिसूचित (Notified) केलेले राखीव वन (Reserved Forest) १० कि.मी. परिघात नाही. त्यांनी पुढे सांगितले की पर्यावरणातील सर्व घटकांचा विचार करुनच सदरहू प्रकल्प उभारणीसाठी ही जागा निवडण्यात आलेली आहे. अध्यक्षा यांनी उपस्थितांना सांगितले की सर्व मुद्द्यांची नोंद घेण्यात येत आहे. त्यावेळी काही उपस्थितांनी प्रश्न विचारला की शासनाने औद्योगिक क्षेत्र हे फक्त आपल्या भूखंडापुरतेच घोषित केले किंवा सर्व तो भाग औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित केलेला आहे याबाबत स्पष्टीकरण द्यावे.

यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की त्यांनी त्यांच्या प्रकल्पाबाबत औद्योगिक क्षेत्राची परवानगी घेतलेली आहे, त्यावेळी प्रकल्प प्रवर्तकांनी हरित पट्टा/क्षेत्र नसल्याचे प्रतिपादन केले. त्यावेळी काही उपस्थितांनी सदरहू विभाग हा अजूनही हरित पट्टा/क्षेत्र असल्याचे एकत्रितपणे सांगितले.

त्यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना शांततेने मुद्दे मांडण्याचे आवाहन करताना सांगितले उसरोली गाव हे कुठल्या क्षेत्रात आहे हे कंपनीस माहित असणे अपेक्षित नाही. सदरहू बाब ही नियोजन प्राधिकरण (Planning Authority) ठरवत असते की उसरोली गाव हे कुठल्या वर्गात वर्ग करायचे. प्रकल्प प्रवर्तक फक्त त्यांच्या प्रकल्पाबाबतच उत्तर देणार आहेत. अध्यक्षा यांनी उसरोली गावाचा झोन/क्षेत्राचे प्रमाणपत्र दाखविण्याची सूचना प्रकल्प प्रवर्तकांना केली.

अध्यक्षा यांनी प्रकल्प अधिकारी यांना प्रकल्पात दररोज २५०.० टन कोळसा वापरण्याबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की प्रकल्पात फक्त कोळसा वापरणार नाही. कोकणात भाताचे भरपूर उत्पादन होते, तर भाताचे कुस/तुस त्यालासुध्दा राईस हस्क म्हणतात, तेही वापरणार आहोत. आम्ही कुठल्या प्रकारचे इंधन वापरणार असे पर्याय देताना शासनास त्यातील एक कोळसा दिलेला आहे. त्याचप्रमाणे बायो-मास म्हणजे साखर कारखान्यातील बगॅस, झाडांची पाने हीसुध्दा

इंधन म्हणून वापरणार आहोत. प्रकल्पातील बॉयलरमध्ये सर्व प्रकारची इंधने वापरण्यात येतील अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की प्रकल्पातील उत्पादन प्रक्रियेमुळे कॅन्सरसारखे आजार जास्त प्रमाणात होण्याची शक्यता उपस्थिताकडून व्यक्त करण्यात आली. प्रकल्पात कॅन्सर होणारे क्रायोजनिक केमिकल उत्पन्न करण्यात येत नाही. जे इथेनॉल बनविणार, ते आपण आपल्या गाडयांमध्ये इंधन म्हणून वापरतो.

श्री भाई शिंदे यांनी सांगितले की इथेनॉलबद्दल आपण सांगितले, मात्र कोळसा वापरल्यानंतर होणा-या प्रदूषणाबाबत काहीच सांगत नाहीत. २५० टनाची कोळशाची भुकटी जी वातावरणात उडणार आहे, त्याबद्द्ल काही सांगत नाही. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की इलेक्ट्रो-स्टॅटिक-प्रेसिपरेटर हे अत्याधुनिक हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा प्रकल्पात कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यात एनॉईड व कॅथॉईडच्या प्लेट्स असतात. ईएसपी हे ९९.९% कार्यक्षम असते. त्यामुळे उत्पन्न होणारी राख ही बाहेर जाणार नाही, खाली पडेल व ती राख सिमेंट कंपनींना उपलब्ध करुन देण्यात येईल. ती पॅक करुन सिमेंट कंपनीना पुरविण्यात येईल. ती ओपीसी प्रकारच्या सिमेंटमध्ये वापरली जाते.

यावेळी उपस्थितांनी एकत्रित शंका विचारली की प्रकल्पात ETP सयंत्रणा असते. पण येथील ९५% उद्योग हे ETP सयंत्रणा कार्यान्वित करत नाहीत. सर्व सांडपाणी प्रक्रियेशिवाय नदीत सोडले जाते, येथे तसे कशावरुन होणार नाही. यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की जरी संपूर्णपणे हा मुद्दा नाकारत येत नसला, तरी पर्यावरण संरक्षणासाठी शासनाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची स्थापना केलेली आहे. ते वेळोवेळी तपासणी करत असतात. प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करणे बंधनकारक असून ते न केल्यास कंपन्या बंद करण्यात येतात. प्रदूषणावर देखरेखीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आहे. यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प हा झेडएलडी म्हणजे झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे.

यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत अध्यक्षा यांनी सांगितल्याप्रमाणे म.प्र.नि.मंडळ विविध कारखान्यात वेळोवेळी तपासणी करत असते. सदरहू प्रकल्पाने उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्याचे आश्वासन दिलेले आहे. जर सांडपाणी ते पुनर्वापर करणार आहेत, तर त्यांना त्यावर प्रक्रिया करणे बंधनकारक आहे. प्रकल्प शून्य द्रव निःस्सारण म्हणजे झिरो लिक्विड

डिस्चार्ज असल्याने प्रकल्पातून एक थेंब जरी प्रक्रिया केलेले सांडपाणी बाहेर आले, तरीही म.प्र.नि.मंडळ कंपनीविरुध्द कारवाई करणार आहे.

आयोजक यांनी सांगितले की प्रकल्पात कन्टीन्युअस ऑनलाईन मॉनिटरिंग सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. उपस्थितांनी एकत्रितपणे परिसरातील कंपन्या प्रदूषण करत असून येथे २५० टन कोळसा रोज जाळला तर प्रचंड प्रदूषण होईल असे मत मांडले. यावेळी अध्यक्षा यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

श्री भाई शिंदे यांनी परत बोलण्यास सुरवात केली असता दुस-यांनाही बोलण्याची संधि देण्यात यावी अशी सूचना अध्यक्षा यांनी केली.

४) **श्री नरेश तातुराम पाटील, सदस्य,जिल्हा परिषद-रायगड, तालुका अध्यक्ष,राष्ट्रवादी कॉंग्रेस-**

त्यांनी सांगितले की प्रकल्प अधिकारी यांनी सादरीकरणात प्रकल्पाविषयी सुटसुटीत, चांगली माहिती दिली. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ते जी काळजी घेणार आहेत, ती घेतली तर परिसरातील लोकांच्या आरोग्याला धोका होईल असे वाटत नाही. ज्या सुविधा स्थानिकांना पाहिजेत, त्या ते देणार असतील व स्थानीकांना रोजगाराची संधि मिळणार असेल, प्रकल्पामुळे स्थानिक व्यवसायात जी अप्रत्यक्ष वाढ होणार आहे, त्यात स्थानिकांचा फायदा होणार असेल, स्थानिकांच्या आरोग्याची काळजी घेऊन जर प्रकल्प चालू ठेवणार असतील, तर प्रकल्पाला विरोध करण्यात काहीही अर्थ नाही.

त्यांनी पुढे सांगितले की आमचा खालापूर तालुका हा औद्योगिक तालुका झालेला आहे. येथे अनेक कंपन्या आल्या. येथील स्थानिक शेतक-यांनी जमिनी प्रकल्पासाठी विकल्या आहेत. जर प्रकल्प चालले नाहित, तर येथील तरुण बेकारच राहतील. खालापूरच्या ग्रामस्थांनी नेहमीच प्रकल्पाचे स्वागत केलेले आहे.

श्री नरेश पाटील यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीमार्फत प्रकल्प प्रवर्तकांना आवाहन केले की नागरिकांच्या आरोग्याला धोका होणार नाही, याची काळजी सतत घेण्यात यावी. सदरहू प्रकल्पात स्थानिकांना रोजगाराची संधि देण्यात यावी, प्रकल्प अधिकारी यांनी प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यक्षमतेने कार्यान्वित करावी. ज्या तक्रारी असतील, त्या सूचना समजून त्याचे निराकरण करण्यात यावे. मी प्रकल्पास पाठिंबा देतो.

प्रकल्प प्रवर्तकांनी श्री नरेश पाटील यांना उत्तर देताना अभिवचन दिले की प्रदूषणाची जी मानके आहेत, त्याचे तंतोतंत पालन करण्यात येईल. त्यांनी येथे सांगितले की कोळशाची राखसुध्दा पॅक करुन विकण्यात येणार आहे. प्रकल्पात कच्चा माल म्हणून जे धान्य वापरण्यात येणार आहे, त्यातील प्रत्येक भागाचा उपयोग आहे. धान्यातील स्टार्चचा इथेनॉल बनविण्यात येईल, प्रोटीन फायबर कॅटल फीड म्हणजे गुरांना धान्य म्हणून व कार्बन-डाय-ऑक्साईड बाटलीत बंद करुन शीतपेय उद्योगांना पुरविण्यात येईल, तर राख ही स्थानिक वीटभट्टी उत्पादकांना व सिमेंट उद्योगास देण्यात येईल. त्याचप्रमाणे रोजगारात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल.

**५) श्री सनी यादव, राहणार-देवन्हावे गाव, तालुका-खालापूर,जिल्हा-रायगड, कोषाध्यक्ष,भारतीय जनता पक्षः-**

त्यांनी मत मांडले की अशी सुनावणी होणे हे गरजेचे आहे. स्थानिकांच्या शंका दूर झाल्याशिवाय कोणीही प्रकल्पास पाठिंबा देणार नाही. इथेनॉल म्हणजे इथील अल्कोहोल. केंद्र सरकारचे धोरण आहे की इथेनॉलला प्राधान्य दिले पाहिजे. पेट्रोलियम पदार्थाच्या किंमती वाढत असल्याने त्याला पर्याय शोधणे गरजेचे आहे. ब्राझील सारखा देश १९३२ पासून अल्कोहोलचा वापर इंधन म्हणून करत आहे. ब्राझील नंतर स्वीडन इथेनॉलचा वापर करतो. आपण प्रकल्प सुरु करायचा की नाही याचाच विचार करत आहोत. येथे उपस्थितांनी ज्या शंका विचारल्या, त्यांचे निरसन करण्यात यावे. स्थानिकांना काहीही त्रास होणार नाही, याची जबाबदारी ही प्रकल्प व्यवस्थापनाची आहे. प्रकल्पास पाठिंबा व्यक्त करताना स्थानिकांच्या शंकेचे निरसन करण्यात यावे ही सूचना.

**६) सौ. कामिनी भुषण पाटील, सदस्य, ग्रामपंचायत खानाव,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

परिसरातील बेरोजगार युवक युवतींना या प्रकल्पामुळे रोजगार मिळणार असेल, तर या प्रकल्पाचे मी स्वागत करते.

७) **श्री नारायण पाटील, राहणार- खाणाव,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

या प्रकल्पामुळे माझ्या गावातील व दहा गावातील लोक सुखी होतील.

**८) श्री गौतम काशीद पवार, सरपंच, ग्रामपंचायत, चिलठण,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

त्यांनी सांगितले की हा प्रकल्प आमच्या ग्रामपंचायत कार्यालयाच्या हद्दीत येतो. ज्यावेळी म.प्र.नि.मंडळाने सदरहू प्रकल्पाचा पर्यावरणविषयक दस्तावेज ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करुन दिला होता व ग्रामस्थांनी लेखी सूचना, आक्षेप नोंदविण्याचे व जनसुनावणी बैठकीस उपस्थित राहण्याची सूचना करण्यात आलेली होती. त्यावेळी विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात आलेली होती. त्यावेळी ग्रामसभेत जरी सर्वांनी प्रकल्पास विरोध केला नाही, तरीही स्थानिकांच्या जीवास सदरहू प्रकल्पामुळे काहीही धोका होऊ नये असे मत मांडले.

श्री गौतम पवार, सरपंच यांनी मत मांडले की अहवालात जो मागवा तलाव प्रकल्पा पासून १.५ कि.मी. अंतरावर आहे, त्याबाबत खुलासा करण्यात यावा असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की तो उसरोळी पाझर तलाव आहे. गुगल इमेजनुसार प्रकल्पाचे काम चालते. त्या गुगल इमेजमध्ये नांव मागवा डॅम असे आलेले आहे. मात्र मुख्य अहवालात उसरोळी लिहून कंसात मागवा असे लिहिलेले आहे.

श्री गौतम पवार, सरपंच यांनी पुढे सांगितले की उसरोळी चिलथन ग्रामस्थांची अशी मागणी आहे की प्रकल्पासाठी उसरोळी तलावातील पाणी वापरण्यास घेऊ नये. कारण उसरोळी, खरवली, चिलथन, खानाव ही पाणी टंचाईयुक्त गावे आहेत. तेथे टँकरने पाणी पुरविले जाते.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की प्रकल्प उत्पादनासाठी लागणा-या पाण्याची सोय ही जवळील नदीतून करण्यात येणार आहे. त्यासाठी शासनाच्या संबंधित विभागाकडून परवानगी घेण्यात येईल. येथे ग्रामस्थांना अभिवचन देण्यात येते की उसरोली पाझर तलावातून प्रकल्पासाठी पाणी घेतले जाणार नाही.

श्री गौतम पवार, सरपंच यांनी पुढे प्रश्न विचारताना सांगितले की पातळगंगा नदीचे अंतर अहवालात ३.० कि.मी. दाखविलेले आहे. आमच्या माहितीप्रमाणे ३.० कि.मी. कोणतीही पातळगंगा नदी नाही.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की सदरहू अंतर हे हवाई अंतर आहे. श्री गौतम पवार, सरपंच यांनी पुढे प्रश्न विचारला की अहवालात असा उल्लेख आहे की प्रकल्पासाठी लागणारे पाणी हे पाटबंधारे विभागाची परवानगी घेऊनच उचलण्यात येईल. त्यांनी स्पेंट वॉशविषयी माहिती विचारली. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की धान्यावर आधारित इथेनॉल प्रकल्पात स्पेंट वॉश तयार होत नसून घट्ट सिरप (Thick Syrup) तयार होते. हे घट शिरप ड्रायर मध्ये वाळवले जाते. त्यातून जे पशुखादय तयार होईल त्यामध्ये १०% मॉईशरच्या स्वरुपात पाणी किंवा घट्ट शिरप राहणार आहे, ते आपण बॅगमध्ये भरणार.

श्री गौतम पवार, सरपंच यांनी पुढे प्रश्न विचारला की आपण २५० टन कोळसा वापरणार, तर त्याचे व्यवस्थापन कसे असेल? जर आपण उघड्यावर ठेवला, तर त्याची हालचाल करताना कोळशाचे कण हे हवेत मिसळतील. त्यासाठी उपाययोजना.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की कोळशासाठी बंद शेड (Close Coal Shed) बांधण्यात येईल. त्याला कन्व्हेअर बेल्टचे एक आऊटलेट असेल, ते कोळसा ब्रॉयलरला नेईल. त्यामुळे कोळशाचे पावसापासून संरक्षण होईल व बंद शेडमुळे प्रदूषणाचा त्रास होणार नाही.

श्री गौतम पवार, सरपंच यांनी विचारणा केली की $CO_2$ बाटल्यांमध्ये बंद करणार, तर त्यासाठी कशाप्रकारे व्यवस्थापन करणार आहात?

प्रकल्प प्रवर्तक यांनी संपूर्ण शास्त्रीय माहिती देऊन सांगितले की मोठया सिलेंडरमध्ये तो बंद करुन कंपन्यांना दिला जाईल.

श्री गौतम पवार यांनी सांगितले गावाचा सरपंच व ग्रामस्थ यांचा विकासाला विरोध नसतो. पण परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर कुठलाही वाईट परिणाम, श्वसनाचे त्रास, प्रदूषण होता कामा नये. लोक सहकार्य करतात, पण त्रास झाला तर विरोध करतात.

प्रकल्प प्रवर्तक यांनी अभिवचन दिले की प्रकल्पात सर्व नियमांचे पालन करण्यात येऊन सर्व प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा योग्यप्रकारे राबविण्यात येईल.

९) **श्री संकेत कृष्णा सिनकर, राहणार-खिरकंडी गाव, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड:-**

त्यांनी मागणी केली आपल्या अहवालातील ३.४ मुद्द्यात असे प्रतिपादन केले की आपणास अनुभवी मनुष्यबळ लागेल. तर आपण स्थानिकांना रोजगार देणार असे अभिवचन कसे देता?त्यांनी कंपनीतील बॉम्बे या नावाला आक्षेप घेतला. येथे स्थानिक मराठीत आहेत, तर मुंबई नांव का घेतले जात नाही?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की कारखान्यात २५० लोकांना रोजगाराची संधि मिळू शकते. त्यात कुशल व अनुभवी, कुशल, अर्ध कुशल व स्वच्छता कामगार यांची आवश्यकता असते. त्यात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल.

श्री सिनकर यांनी आक्षेप नोंदविला की अनुभव नाही या मुद्दयावर आपण स्थानिकांना प्रकल्पात रोजगाराची संधि देणार नाहीत. येथे पूर्वी असेच झालेले आहे. आपणास आवश्यक असणारे कुशल कामगार परिसरात जर नसतील तर आपण बाहेरील आणणार. त्यावेळी काही स्थानिक उपस्थितांनी एकत्रित रोजगाराअगोदर प्रशिक्षण योजना राबविण्याची मागणी केली.

प्रकल्प प्रवर्तकांनी या मागणीचे स्वागत करुन सांगितले की प्रकल्प व्यवस्थापन स्थानिकांना प्रशिक्षण देण्याबाबत धोरण तयार करेल. यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली की प्रकल्प व्यवस्थापनाने त्यांना आवश्यक असणा-या मनुष्यबळाची त्यात कुशल, अर्धकुशल व इतर कर्मचारी यांची माहिती परिसरातील सर्व ग्रामपंचायतीस उपलब्ध करावी. त्यांना आपल्या गरजेनुसार प्रशिक्षण देण्यात यावे. प्रकल्प सुरु होण्याच्या ६-७ महिने अगोदर प्रशिक्षण योजना सुरु केली, तर आपणास प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होईल. यात स्थानिक युवक युवती, पदवीधर यांना प्रकल्पात समाविष्ट करण्याची काळजी घेण्यात यावी. प्रकल्प प्रवर्तकांनी योजना राबविण्याचे अभिवचन दिले.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की बॉम्बे हे नांव कंपनी रजिस्टारकडून मंजूर झालेले आहे.

**१०) श्री संतोष बैलमारे, सदस्य,सावरोली ग्रुप ग्रामपंचायत, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

त्यांनी सांगितले की ग्रामपंचायत हद्दीत लहान-मोठे असे एक हजार उद्योगधंदे कार्यरत आहेत. त्यांनी प्रकल्प सुरु होण्याअगोदर प्रशिक्षण योजना राबविण्याची सूचना केली. त्यांनी मागणी केली की स्थानिकांनाच रोजगाराची संधि देण्यात यावी. त्यासाठी ग्रामपंचायतींना पत्र आगाऊ पाठविण्यात यावे.

श्री बैलमारे यांनी सांगितले की प्रकल्पाचे अधिकारी प्रकल्प सुरु करण्याअगोदर सर्वप्रकारची आश्वासने देतात व नंतर गेट बंद करुन येऊ देत नाहित. त्या कारखान्याविरुध्द आम्हांला आंदोलने करावी लागतात. स्थानिकांना येऊ देत नाहीत. त्यावेळी स्थानिक पोलीस यंत्रणा ही आमच्या विरोधात जाते. आम्ही आमच्या जमिनी प्रकल्पाला दिलेल्या असतात, तर आम्ही रोजगाराची अपेक्षा करण्यात काय चुक आहे? आमची मागणी आहे की स्थानिकांना कायमस्वरुपी रोजगार देण्यात यावा.

त्यांनी स्थानिकांना प्रकल्पाचे स्वागत करण्याची सूचना केली. प्रकल्पामुळे ग्रामपंचायतीस कर मिळेल, त्यामुळे पायाभूत सुविधा वाढण्यास निधी उपलब्ध होईल. अप्रत्यक्ष रोजगारात वाढ होईल. त्यांनी स्थानिकांना विकासाला विरोध न करण्याची सूचना केली. प्रदूषणाला विरोध करा. त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना गावाच्या विकासात सहकार्य करण्याची सूचना केली. पण जर सहकार्य केले नाही तर गाव हा विरोधात उभा राहिल अशी माहिती दिली. सीएसआर निधीतून शिक्षणासाठी काही योजना राबविण्यात याव्यात. गावातील लोकांना वैदकीय सुविधा उपलब्ध होण्यासाठी गावात दवाखाना बांधण्याची मागणी केली. आपण असे सामाजिक काम करावे की इतर गावांना वाटले पाहीजे की हा कारखाना आपल्या गावात हवा होता.

प्रकल्प प्रवर्तक यांनी स्थानिकांना प्रशिक्षण व रोजगारात प्राधान्य देण्याचे आश्वासन दिले.

**११) श्री महेश पाटील, राहणार-शिरोली, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

त्यांनी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी विचारणा केली की कंपनीने केलेल्या सादरीकरणात पाणी,हवा यांची गुणवत्ता पातळी दाखविण्यात आलेली आहे.

तर नमुने गोळा करताना फक्त कारखान्याने केले की त्याबरोबर शासकीय यंत्रणेचा सहभाग होता?

सदस्य यांनी उत्तर देताना सांगितले की केंद्र शासनाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना,२००६ नुसार काही विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण अनुमती घेणे बंधनकारक आहे. त्यासाठी प्रथम प्रकल्पास केंद्र शासन टीओआर-म्हणजे पर्यावरणीय अहवाल कसा करावा याच्या अटी व शर्ती मंजूर करते. प्रकल्प स्थानापासून १० कि.मी. परिघातील पर्यावरणीय सद्यस्थिती म्हणजे जल, वायू, ध्वनि, भूगर्भातील पाणी, जमीन याची सद्यस्थितीतील पातळी म्हणजे प्रथम अभ्यासामुळे बेसलाईन डाटा तयार करणे. त्यासाठी केंद्र सरकारतर्फे मान्यताप्राप्त सल्लागार/Accredited Consultant नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यांच्या कडून हा आभ्यास केला जातो, नमुने गोळा करताना शासकीय यंत्रणेचा सहभाग नसतो. जनसुनावणीत स्थानिकांनी केलेल्या सूचनांचा समावेश करुन अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल केंद्र शासनास सादर करणे बंधनकारक आहे. पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्यानंतर व प्रकल्प सुरु झाल्यानंतरही दर सहा महिन्याने त्यांना पर्यावरणाच्या सद्यस्थितीचा अहवाल जल, वायू, ध्वनि, भूगर्भातील पाणी, जमीन यांवर होणारा संभाव्य आघात याचा अभ्यास हा केंद्र शासनास पाठवावा लागतो. मान्यताप्राप्त सल्लागार/Accredited Consultant केलेल्या सर्वेक्षण व केंद्र शासनाने पारित केलेले मानके यावरुन प्रकल्प प्रदूषण करतो वा नाही याचा निष्कर्ष काढला जातो. या अभ्यासाचा उद्देश प्रकल्प स्थापन करण्याअगोदर तेथील पर्यावरणाची स्थिती व प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर पर्यावरणीय स्थिती तपासणे असा आहे.

**१२) <u>श्री उध्दव नामदेव देशमुख, विद्यमान उपसरपंच, नारंगी ग्रामपंचायत, तालुका-खालापूर,जिल्हा-रायगड:-</u>**

य़ेथे २,००० एकर जमिन एमआयडीसीकडे पडून आहे. तरी माझी प्रशासनास विनंती आहे की पर्यावरण खराब न करता कंपनीत लागणा-या कामगारांसाठी स्थानिकांना प्रशिक्षण द्यावे, येथे दवाखान्याची कमतरता आहे, तरी एक दवाखाना काढण्यात यावा. त्याचप्रमाणे रोजगाराची संधि देताना प्रथम उसरोली गावाला प्रथम संधि द्यावी, पण शेजारी ज्या पंचायती आहेत, तेथील लोकांनाही रोजगाराची संधि देण्यात यावी. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पामुळे प्रदूषण होऊ नये म्हणून प्रदूषण नियंत्रण मंडळाने लक्ष ठेवावे.

**१३)श्री विठ्ठल बाळकृष्ण वाघमारे, राहणार-खानावाडी, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

मी खानावाडीतील एक ग्रामस्थ आहे. मी १५ कि.मी. लांब असलेल्या टाकाई गावात कामावर रोज जात असतो. ही कंपनी जर कार्यान्वित झाली व जर ह्या कंपनीत रोजगार मिळाला तर मला रोज १५-२० कि.मी. लांब जाण्याची गरज पडणार नाही. तरी माझ्याबरोबर गावातील लोकांना रोजगार मिळेल, म्हणून मी प्रकल्पास पाठिंबा/संविधान देतो.

**१४) श्री अनंत विष्णु भोंगे, खाणाव तंटामुक्ती अध्यक्षः-**

माझ्या आदिवासीवाडीत जवळजवळ २०० मुले ही बेरोजगार आहे. शिवाय आजूबाजूच्या परिसरात अनेक बेरोजगार मुले आहेत. तरी येथील बेरोजगारांना नोकरी मिळून त्यांचा उदरनिर्वाह होईल, म्हणून मी या कंपनीचे स्वागत करतो.

**१५) श्री जयदास भोंगे, राहणार- खाणाव,तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

आज सामान्य माणसाला केमिकल म्हणजे काय हे माहित नाही. केमिकल कंपनी म्हणून लोकांना घाबरवले जाते. मी गेले २० वर्षे केमिकल प्रकल्पात काम करत आहे. इथेनॉल हा आपल्या जीवनाचा एक भाग आहे. आज गेले दोन वर्षे करोनामुळे सॅनिटायझरचा बराच वापर करत होतो. सॅनिटायझरमध्ये ७०% अल्कोहोल आहे. लोकांना घाबरवून कंपनीला विरोध करत आहेत. कुठल्याही कंपनीला आपल्या कामगारांसाठी सुरक्षितता द्यावीच लागते. कुठलीही जीवित हानी तेथे होत नाही, एखादा अपघात होऊ शकतो, तो अपघात असतो. त्याचप्रमाणे कर्मचा-याच्या कर्तृत्वाप्रमाणे त्याची प्रगती होऊ शकते. त्यांनी सांगितले की ते प्रथम कामगार होते, आता विभाग प्रमुख (Head of Department) आहेत. जसे आपण कंपनीला देऊ, त्याप्रमाणे आपला संवर्ग (category) बदलतो. सदरहू प्रकल्पास माझा पुर्ण पाठिंबा आहे.

**१६) श्री सिध्देश सुधाराव आमरे, ग्रुप ग्रामपंचायत, नंदनपाडा, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

त्यांनी सांगितले की सादरीकरण चांगले केले असले तरी कंपनी प्रशासनास प्रश्न विचारतो की कंपनीतील सुरक्षितता, गळती (Spillage, Lekage) टाळण्यासाठी काय उपाययोजना अंगिकारणार आहात.

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की संपूर्ण प्रकल्प हा आधुनिक स्वंयचलित (Automated) असून प्रत्येक रिएक्टरला टेमप्रेचर सेन्सर्स, ऑक्सीजन अन्लायझर, पीएच अन्लायझर कार्यान्वित केलेले असतील. त्याचा सर्व डेटा हा पीएलसी प्रणालीत येत असतो. त्यामुळे कुठेही गळती झाल्यास ते प्रणालीवर दिसते व लगेचच पुढील कार्यवाही करण्यात येते.

त्याचप्रमाणे पेसो (Petroleum Explosive Safety Organization) नुसार साठवण भागात (Storage Area) फोमिंग प्रणाली, स्वंयचिल आग प्रतिबंध प्रणाली (Automated Fire Exhaustive System) व $CO_2$ बॉटल या तीन्हीचे एकत्रित प्रणाली दिलेली आहे. ती कार्यान्वित करण्यात येणार आहे. पेसोचे अभियंते ती कार्यान्वित करतात, त्यानंतरच प्रकल्प चालू करण्यास परवानगी मिळते.

श्री आमरे यांनी पुढे प्रश्न विचारला की आपण $CO_2$ फोमचे सांगितले, पण पाण्याचे सांगितले नाही. जर आग लागली तर पाण्याचे काय नियोजन आहे?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की रेन वॉटर हार्व्हेस्टींगचा २५०० घनमीटरचा टँक बनविणार आहोत. तो आग प्रतिबंध प्रणालीला जोडलेला असेल. प्रकल्पात कुलींग टॉवरचे बेसिन बनतील, त्यात हजार घनमीटर पाणी साठवलेले असेल. पुर्ण सिस्टम हे ऑटो डिटेक्टेड राहणार आहे.

**१७) <u>श्री अशोक मराजगे, वडवळ, तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-</u>**

त्यांनी विचार मांडले की जनजागृत्तीसाठी शासन आपल्या दारी आलेले आहे. या तालुक्यात विविध कंपन्यांचे स्वागत झालेले आहे व जमेल तशी मदत करण्यात आलेली आहे. काही पूर्वानुभव चांगले नसतात. कवडीमोल भावाने कंपनीसाठी जमीन घेतली जाते पण कित्येक वर्षे काहीच होत नाही. येथील मुलांना रोजगारासाठी बाहेर जावे लागते. प्रकल्प कार्यान्वित झालाच पाहिजे. मात्र कंपनी सुरु झाल्यावर त्याचे दूरगामी परिणामही अभ्यासले पाहिजे. कंपनीमुळे परिसरात दुष्परिणाम होऊ नये. प्रकल्प अधिका-यांनी प्रश्नांना चांगली उत्तरे दिली. मात्र या प्रकल्पामुळे जर काही दुष्परिणाम झाले तर सर्वजण एक होऊन कंपनीस विरोध करतील. या प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल, ग्रामपंचायतीस कर मिळेल, अप्रत्यक्ष स्थानिक व्यवसायात वाढ होईल.

त्यांनी पुढे सूचना केली की परिसरात गोदरेज, टाटा यांनी सीएसआर निधीतंर्गत प्रथम कामे केली व नंतर प्रकल्प चालू केले. तरी आपले याबाबत काय धोरण आहे? या परिसरात आदिवासी समाज भरपूर आहे. त्याचप्रमाणे स्थानिकांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. प्रकल्पात १० वी नापास, १२ वी नापास युवक युवतींना आपण प्रकल्पात कायमस्वरुपी रोजगार देण्यात यावा.

प्रकल्प प्रवर्तकांनी सकारात्मक उत्तर देताना सांगितले की बैठकीत अध्यक्षा यांनी प्रकल्प सुरु होण्याअगोदर ५-६ महिने आधी प्रशिक्षण योजना राबविण्याची सूचना केलेली आहे. त्याप्रमाणे कंपनी व्यवस्थापन धोरण तयार करुन ग्रामपंचायत कार्यालयाशी संपर्क साधेल. स्थानिक युवक युवतींना प्रशिक्षण देण्यात येईल.

श्री अशोक मराजगे यांनी कुठलाही पक्षपात न करता योजना राबविण्याची व स्थानिकांना रोजगाराची संधि देण्याची मागणी करत प्रकल्पास शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री अशोक मराजगे यांना ज्या पध्दतीने सूचना उपस्थित केल्या, त्या पध्दतीनेच जनसुनावणी होणे अपेक्षित आहे असे मत मांडले. मात्र उपस्थितांनी धावून आक्षेप नोंदविणे अपेक्षित नाही. जनसुनावणी ही स्थानिकांच्या सूचना, आक्षेप, विचार नोंदविण्यासाठी असून उपस्थित प्रस्तावित प्रकल्पाबाबत सकारात्मक किंवा नकारात्मक विचार नोंदवू शकतात. प्रशासनाचे काम आपण उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप नोंदवून बैठकीच्या इतिवृत्तात त्याचा समावेश करुन शासनास कळविणे हे आहे.

अध्यक्षा यांनी विचार मांडले की कंपनीत जो मेहनत करतो व ध्येय पुरे करतो त्याची प्रगती होते. जसे स्थानिकांना रोजगाराची गरज आहे, तसेच कंपनीलाही मनुष्यबळाची गरज आहे. तरी बैठकीत चर्चा केल्याप्रमाणे प्रशिक्षण कार्यक्रम तयार करुन राबविण्यात यावा.

**१८) श्री अंकीत साखरे, सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत देवन्हावे, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड:-**

श्री अंकीत साखरे, सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत देवन्हावे यांनी सांगितले की केंद्र शासनाचे इथेनॉलबाबत धोरण लक्षात घेता देवन्हावेचा सरपंच म्हणून समर्थन देतो. आमच्या ग्रामपंचायतीच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात उद्योग, आंतरराष्ट्रीय दर्जाचे थीम पार्क आहे. थीम पार्क, उद्योगांमुळे या परिसरात वेगळीच रोनक आलेली आहे. उद्योग, प्रकल्प आल्यामुळे स्थानिकांना रोजगाराची संधि मिळते. त्याप्रमाणे परिसरात अप्रत्यक्ष व्यवसायात वाढ होते.

त्यांनी पुढे सांगितले की आलेल्या उद्योगाचे स्वागत करण्यात यावे. त्याचप्रमाणे नागरिकांच्या आरोग्याची हमी चांगल्याप्रकारे कंपनी देत असेल, तर मी या प्रकल्पाचे समर्थन करतो.

**१९)श्री हरिचंद्र रघुनाथ पाटील, माजी सभापती, खालापूर तालुका, जिल्हा-रायगडः-**

श्री पाटील यांनी सांगितले की जनसुनावणीच्या सुरवातीस महर्षी वेदविज्ञान संस्थेने कंपनीने आक्षेप नोंदविला होता ते असे की ३२ ग ची जमिन होती, १३ एकर जमिनीमधील १० एकर जमिन माझ्या एकट्याची आहे. त्या १० एकराला ३२ ग ची परवानगी आणून त्याचे खरेदीखत केलेले आहे. त्यांनी पुढे सांगितले की तीन सर्व्हे नंबर असलेली सर्व जमिन मी आठ वर्षांपूर्वी खरेदी केलेली आहे. आठ वर्षांनंतर जमिन विकत गेलेली आहे. त्यानंतर त्यांनी आक्षेप घेतलेले आहे. त्यांनी अध्यक्षा यांना विनंती केली की सुनावणीत याचा विचार करण्यात यावा. त्यांनी अध्यक्षा यांनी सांगितले की ३२ ग ची जमिन खरेदी होते ती परवानगीशिवाय खरेदी होत नाही, आणि मी नियमाप्रमाणे खरेदीखत केलेले आहे.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सदरहू प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक काही सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. अध्यक्षा यांनी सदस्य यांना बैठकीचा समारोप करण्याची सूचना केली.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की मेसर्स रॉकिंग बॉम्बे बेव्हरेजेस प्रायव्हेट लिमिटेड, उसरोली, तालुका- खालापूर, जिल्हा-रायगड यांच्या १२५.० केएलपीडी इथेनॉल आणि १२५.० केएलपीडी एक्स्ट्रा न्युट्रल अल्कोहोल (ENA) उत्पादन तयार करण्यासाठी २५०.० केएलपीडी धान्यावर आधारित आसवणी प्रकल्पाची उभारणीसाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी म.प्र.नि. मंडळ व जिल्हाधिकारी कार्यालय,रायगड यांच्यातर्फे आयोजित करण्यात आली होती. अतिशय चांगल्या पध्दतीने ही जनसुनावणी पार पडली. येते विरोध नाही, पण जे काही प्रश्न आहेत, विचार, टीकाटिप्पणी सुचना केलेली आहे. बैठकीत करण्यात आलेल्या सूचनांचे प्रकल्प प्रवर्तकांकडून तंतोतंत पालन करण्याच्या सूचना दिल्या.

सदस्य यांनी सांगितले की बैठकीत स्थानिकांनी अनेक सूचना,हरकती,आक्षेप नोंदविलेले असून त्याचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येईल. त्याचप्रमाणे बैठकीत एकूण २५

ग्रामपंचायत / ग्रामस्थ यांनी प्रकल्पाला समर्थनार्थ पत्र सादर केले आहे, तसेच २ लेखी सूचना/आक्षेप सादर केले असून त्यास प्रकल्प प्रवर्तकांकडून उतर मिळाल्यानंतर लेखी सूचना, हरकती उत्तराबरोबर अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व बैठकीच्या इतिवृतासोबत अध्यक्षांच्या मंजूरीने म.प्र.नि. मंडळाच्या मुख्यालयातर्फे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागास सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल. सदस्य यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी ही संपन्न् झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

सोबत प्राप्त झालेले ना हरकती २५ व हरकती २ लेखी सूचना/आक्षेप जोडलेले आहेत.

**(विद्यासागर किल्लेदार)**
सदस्य, आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी-रायगड,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन, सीबीडी बेलापुर,
नवी मुंबई

**(डॉ. पद्मश्री बैनाडे)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,
जिल्हा-रायगड